# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.04.2026** **वारः शनिवार**

---

1. महिला आरक्षणाबाबतचं घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर, इतर दोन विधेयकही सरकारनं घेतली मागे
2. सरकारनं सादर केलेल्या महिला आरक्षण विधेयकाचा महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंध नसल्याचा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचा दावा; तर विरोधकांनी ऐतिहासिक संधी गमावल्याची सरकारची टीका
3. 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'च्या 50 ठिकाणी शाखा होणार आणि
4. येत्या एक जूनपासून राज्यातल्या सर्वच बस स्थानकांवरील शौचालय सुविधा प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत

<u>**महिला आरक्षण विधेयक**</u>

महिला आरक्षणाच्या संदर्भातील, एकशे एकतीसावं घटना दुरुस्ती विधेयक, 2026, काल लोकसभेत मंजूर झालं नाही. हे घटना दुरुस्ती विधेयक असल्यानं त्यासाठी दोन-तृतीयांश खासदारांची मंजुरी आवश्यक होती; ती न मिळाल्यामुळे हे विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकलं नाही. सभागृहात उपस्थित 528 सदस्यांपैकी 298 सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूने आणि 230 जणांनी विरोधात मतदान केलं. एकशे एकतीसावं घटना दुरुस्ती विधेयक 2026 नामंजूर झाल्यामुळे, मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक ही अन्य दोन विधेयकंही मागे घेत असल्याचं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी जाहीर केलं. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत 2029 पासून महिला आरक्षण लागू करण्यासाठी आवश्यक असलेलं घटना दुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर न झाल्याबद्दल रिजिजू यांनी दुःख व्यक्त केलं. हे विधेयक फेटाळून विरोधकांनी ऐतिहासिक संधी गमावल्याची टीका रिजिजू यांनी केली.

तत्पूर्वी, महिला आरक्षण आणि इतर विधेयकांवर लोकसभेत वादळी चर्चा झाली. महिला आरक्षण लागू करताना सर्व राज्यातल्या खासदारांची संख्या 50 टक्क्यांनी वाढणार आहे. त्यामुळे कुठल्याही राज्याच्या प्रतिनिधीत्वावर अन्याय होणार नाही, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केलं. सध्या सुरू असलेल्या जनगणनेत जातनिहाय गणना होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांमधून, केंद्र सरकार देशाच्या निवडणुकीचं गणित बदलण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. 2023मध्ये मंजूर केलेलं विधेयक सरकारनं पुन्हा आणावं, आम्ही त्याला तात्काळ पाठिंबा देऊ असं ते म्हणाले. देशातले दलित, ओबीसी आणि इतरांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू असल्याची टीका त्यांनी केली. राहुल गांधी यांनी पंतप्रधानांवर केलेल्या आरोपांवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गांधी यांच्या भाषणातील पंतप्रधानांची टीका करणारे मुद्दे काढून टाकावेत आणि त्यांनी क्षमा मागावी अशी मागणी सिंह यांनी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही राहुल गांधींच्या विधानांबद्दल नाराजी व्यक्त केली.

दरम्यान काँग्रेस खासदार शशी थरूर, द्रमुक खासदार कनिमोळी, समाजवादी पक्षाच्या डिम्पल यादव यांनी या विधेयकांवर टीका केली. ही विधेयकं महिला आरक्षणाच्या समर्थनात असल्याचं भासवलं जात असलं, तरी ती प्रत्यक्षात भारतीय संघराज्य रचनेच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी केला. तर केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह तसंच राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी या विधेयकाच्या बाजूने आपली भूमिका मांडली. राष्ट्र उभारणीत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी ही एक ऐतिहासिक संधी असल्याचं सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी नमूद केलं.

**नारीशक्ती**

106वी घटना दुरुस्ती अधिनियम 2023, म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' कालपासून देशभरात लागू झालं आहे. याबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. 2023मध्ये संसदेने हा कायदा संमत केला. लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**हरिवंश**

राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंह यांची काल बिनविरोध निवड झाली. ते सलग तिसऱ्यांदा राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि अन्य पक्षांच्या नेत्यांनी हरिवंश यांचं अभिनंदन केलं आहे.

**कौशल्य विद्यापीठ**

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने येत्या वर्षभरात राज्यात 50 ठिकाणी शाखा सुरू कराव्यात, असं आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल मुंबईत केलं. या विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 100 टक्के नोकरीची हमी मिळेल अशा स्वरूपाची विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी, असंही लोढा म्हणाले. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या तिसऱ्या वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**मिशन कर्मयोगी**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मिशन कर्मयोगी' उपक्रमांतर्गत, महाराष्ट्र राज्याने प्रशासकीय प्रशिक्षणात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. साधना सप्ताह 2026 निमित्त, नवी दिल्लीत आयोजित विशेष सोहळ्यात, राज्याला, उत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य या बहुमानाने सन्मानित करण्यात आलं. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांना, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार, काल प्रदान करण्यात आला. याच सोहळ्यात महाराष्ट्रातील 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी' अर्थात 'यशदा' या संस्थेला विशेष पुरस्काराने गौरविण्यात आलं. 'यशदा'ने iGOT प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करून अधिकाऱ्यांना डिजिटल कौशल्यांत सक्षम केल्याबद्दल हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.

**राजस्व शिबिर-नाशिक, यवतमाळ, सांगली**

सांगली जिल्ह्यातली मिरज इथे, काल छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर पार पडलं. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकासाचे निर्णय पोहोचवून त्याचा प्रत्यक्ष लाभ पात्र गरजूंना व्हावा, या हेतूने हे शिबिर राबवलं जात आहे. यातून समाजाच्या शेवटच्या घटकाचे कल्याण करण्याची प्रामाणिक भूमिका आहे, असं प्रतिपादन बावनकुळे यांनी केलं. या वेळी बोलताना बावनकुळे म्हणाले.....

**नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत, पंचायत समितीमध्ये जिथे जिथे सरकारी जागेवर ज्यांचं घर असेल ते घरं कायदेशीर करून द्यायचा निर्णय सरकारने घेतला. दोन हजार अकरा पूर्वीचे सर्व घरं कायदेशीर करून देणार आहोत, आता आपल्या सरकारने दीड हजार फुटापर्यंतच अतिक्रमण कायदेशीर करण्याचा निर्णय घेतला. आणि एवढंच नाही गायरानमध्ये बसलेल्या लोकांना पट्टे वाटप करण्याकरता जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही अधिकार दिलेले आहेत. ती जागा त्या ग्रामपंचायतला द्यायची ग्रामपंचायतने नमुना आठ मध्ये एंट्री करून, त्यांची पट्टे वाटप करायचे हा निर्णय आपण केलेला आहे. त्या ठिकाणी त्यांना प्रधानमंत्री आवास योजनाच घर दिलं पाहिजे. गायरानमध्ये असलेल्या लोकांना सुद्धा आता त्यांच्या मालकीच घर मिळणार आहे. त्यामुळे गायरान मधल्या लोकांनाही काळजी करायची गरज राहिली नाही.**

मुंबईतील गावदेवीमध्येही काल राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' आयोजित करण्यात आलं होतं. नाशिक जिल्ह्यातल्या, इगतपुरी तालुक्यातल्या कावनाई, यवतमाळ जिल्ह्यातील वडकी इथे देखील हे शिबिर पार पडलं.

**बसस्थानक शौचालये-कोल्हापूर**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनाचं औचित्य साधून, येत्या 1 जूनपासून राज्यातील सर्व बस स्थानकांवरील शौचालय सुविधा प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल कोल्हापुरात केली. कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकाच्या पाहणी दौऱ्यानंतर ते बोलत होते. खासगी कंत्राटदारांमार्फत चालवली जाणारी शौचालय व्यवस्था बंद करून, महामंडळ स्वतः त्याची जबाबदारी घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं. बस स्थानाकांवरील उपहारगृहांची पाहणी करून, प्रवाशांना अधिकृत दरात खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याचे आदेश देतानाच, नियमभंग झाल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचनाही सरनाईक यांनी दिल्या.

**उष्णतालाट-नागपूर, अहिल्यानगर**

हवामान विभागाने नागपूर जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर अहिल्या नगर जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांच्या वेळेत आजपासून बदल करण्यात आला आहे. उन्हाळी सुट्टी लागेपर्यंत जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळी 7 ते 11 या वेळेत भरतील, असा आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे.

**सोलापूर-अवकाळी पाऊस**

सोलापूर जिल्ह्यात तापमानाचा पारा 40 अंशांच्या पुढे गेला आहे. काल जिल्ह्यातील वडाळा इथे अवकाळी पावसाने हजेरी लावली, त्यामुळे तापमानात काही अंशी घट झाली.

**हवामान**

राज्यात येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचीही शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.